N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT
**(Under Section 154 Cr.P.C.)**
प्रथम खबर अहवाल
(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District (जिल्हा):** अहमदनगर **P.S.(ठाणे):** कर्जत

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0318 **Year (वर्ष):** 2024

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 30/04/2024 22:43

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7A |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** बुधवार
**Time Period (कालावधी):** पहर 5
**Date From (दिनांक पासून):** 28/02/2024
**Date To ( दिनांक पर्यंत):** 28/02/2024
**Time From (वेळेपासून):** 15:38 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 15:59 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 30/04/2024 **Time (वेळ):** 22:00 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 030
**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 30/04/2024 22:32 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
दक्षिण, 1 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** कर्जत

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** गणेश नवनाथ दिवटे

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1989

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | कापरेवाडी,कर्जत,कर्जत,अहमदनगर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | कापरेवाडी,कर्जत,कर्जत,अहमदनगर,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):**

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | सागर नलवडे | | | 1. माहीत नाही,कर्जत,अहमदनगर, महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|

10. **Total value of property (In Rs/-)**
(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):

11. **Inquest Report / U.D. case No., if any**
(इनक्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12. **First Information contents** (प्रथम खबर हकीकत ):
मी गणेश नवनाथ दिवटे, वय 35 वर्ष, धंदा शेती, रा. कापरेवाडी, ता.कर्जत, जि.अहमदनगर.
समक्ष हजर राहून फिर्याद देतो की, मी वरील पत्त्यावर राहणेस आहे. मी दि. 28/02/2024 रोजी कर्जत येथील सुरक्षित ठिकाणी हजर राहुन पोलीस उपअधीक्षक श्री.लोखंडे, ला.प्र.वि.अहमदनगर यांना दोन पंचासमक्ष लाच मागणीची तक्रार सांगितली होती की, '' तलाठी कार्यालय, कर्जत येथील तलाठी यांचे हाताखाली काम करणारे खाजगी इसम श्री. सागर नलवडे हे तलाठी मोराळे यांचे नावाने माझेकडे, 'मी व माझा भाऊ श्री. बुवासाहेब नवनाथ दिवटे असे दोघांनी मिळुन श्री. संजय तुकाराम राऊत, रा.ढेरेमळा, कर्जत, जि.अहमदनगर यांचेकडुन मौजे कर्जत येथील गट नं. 134/1 मधिल संपूर्ण विहीरपाणी हिस्सा व दोन आर विहीरपड क्षेत्रात जाणे येणेचे हक्काबाबत केलेल्या खरेदीखताची नोंद 7/12 उता-यावर लावण्यासाठी' लाचेची मागणी करत आहेत. मी आज रोजी खाजगी इसम नलवडे यांची तलाठी कार्यालय कर्जत येथे जावुन भेट घेणार आहे त्यावेळी त्यांनी माझे वर नमुद कामाबाबत माझेकडे लाचेची मागणी केल्यास त्यांचेविरूध्द कारवाई करावी. तसेच त्यांनी तलाठी मोराळे यांचेशी माझी भेट घालुन दिल्यास मी तलाठी मोराळे यांचेशी माझे कामाबाबत चर्चा करणार आहे. त्या चर्चेदरम्यान तलाठी मोराळे यांनी माझ्याकडे वर नमुद कामाबाबत लाचेची मागणी केल्यास तलाठी मोराळे यांचेविरूध्द कारवाई करावी.'' अशी तक्रार नोंदविली होती. पो.उपअधी.श्री. लोखंडे यांनी माझी वरील तक्रार माझ्या स्वहस्ताक्षरात लिहुन घेतली. त्या तक्रारीवर मी, दोन्ही पंचांनी व पो.उपअधी.श्री.लोखंडे यांनी सही केली. त्यानंतर माझे तक्रारी प्रमाणे खाजगी इसम सागर नलवडे व तलाठी मोराळे हे माझेकडे लाचेची मागणी करतात अगर कसे ? लाचेची रक्कम कधी दयावयाची? व कुठे दयावयाची याबाबत लाच मागणी पडताळणी करण्याचे ठरले.
त्यानंतर पो.उप अधी.श्री.लोखंडे यांनी मला व दोन्ही पंचांना पडताळणी कारवाईमध्ये व्हाईस रेकॉर्डरचे वापराबाबत माहिती दिली. श्री. लोखंडे यांचे सुचनेवरून सापळा पथकातील पोकॉ निमसे यांनी व्हाईस रेकार्डरमध्ये नविन मेमरीकार्ड टाकून त्यामध्ये कोणतीही फाईल ध्वनीमुद्रीत नसल्याची खात्री करुन दिली. त्यानंतर पो.उपअधी. श्री. लोखंडे यांनी व्हाईस रेकॉर्डर चालु करून त्यांनी स्वतः दोन्ही पंचांनी व मी निवेदन केले. त्यानंतर पो.उपअधी. श्री. लोखंडे यांनी मला व पंच क्र.1 यांना पडताळणी कारवाई दरम्यान करावयाचे कार्यवाहीबाबत सुचना दिल्या. त्यानंतर व्हाईस रेकॉर्डर सुरु करुन तो माझे ताब्यात देवुन मला व पंच नं. 1 यांना तलाठी मोराळे व त्यांचे हाताखाली काम करणारे खाजगी इसम सागर नलवडे यांची भेट घेण्यासाठी 15/38 वा. माझे बजाज कंपनीची प्लॅटीना मोटार सायकल क्र.एम.एच.16 सीएक्स 9374 वरुन रवाना केले. मी व पंच नं. 1 असे तलाठी कार्यालय, कर्जत येथे गेलो. तेथे आम्ही खाजगी इसम सागर नलवडे यांची भेट घेतली. खाजगी इसम नलवडे यांनी 'सगळा विषय ठरला होता, विहिरीच्या नोंदीला पाच हजार रूपये घेतात, मी काय तुम्हाला जास्त नाही सांगितले' असे म्हणाले. त्यावर मी त्यांना टोटल किती असे विचारले असता नलवडे यांनी त्याला काय पाच देतो आणि नोंदीचे दोन हजार रूपये असे म्हणुन एकुण 7,000/-रुपये लाचेची मागणी केली. त्यानंतर मी व पंच नं. 1 असे तेथुन निघुन पो. उप अधी.श्री लोखंडे व सापळा पथक थांबले त्या ठिकाणी परत आलो. ती वेळ 15/59 वाजताची होती. तेथे पो. उपअधी.श्री. लोखंडे यांनी मला व पंच नं.1 यांना खाजगी इसम सागर नलवडे यांची भेट घेण्यासाठी रवाना केले पासुन परत येई पर्यंतची हकीकत विचारली. त्यानंतर पो.उपअधी. श्री.लोखंडे यांनी दोन्ही पंचासमक्ष व्हाईस रेकॉर्डर मधिल ध्वनीमुद्रीत संभाशण ऐकले. सागर नलवडे यांनी माझेकडे आमचे खरेदी खताची नोंद 7/12 उता-यावर लावण्यासाठी तलाठी यांचेकरीता व स्वतःकरीता 7,000/-रुपये लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले. सागर नलवडे यांनी तलाठी मोराळे हे मतदान केंद्रावर आहेत असे सांगितल्याने तलाठी मोराळे यांचेविरूध्द लाच मागणी पडताळणी करण्याकरीता पो.उपअधी.श्री.लोखंडे यांनी मला व पंच 1 यांना सर्व सुचना समजावुन सांगुन माझे ताब्यात व्हाईस रेकॉर्डर चालु करून देवुन मला व पंच 1 यांना तलाठी मोराळे यांची भेट घेण्याकरीता माझेकडील मोटार सायकलने 16/30 वा. रवाना केले. मी पंच नं. 1 सह रवाना होवुन तलाठी मोराळे यांची सोनमाळी कन्या शाळा, कर्जत येथे भेट घेतली. मी तलाठी मोराळे यांचेशी माझे नोंदीचे कामाबाबत चर्चा केली. तलाठी मोराळे यांनी

करून घेवु, अडचण नाही, करून देतो असे म्हणाले. मी त्यांना उदया चक्कर मारू का असे विचारले असता तलाठी मोराळे यांनी ते उदया सकाळ पासुन जोगेश्वरवाडी, बरगेवाडी, भांडेवाडी ठिकाणी फिरणार आहेत त्यामुळे दुपारी दोन-अडीच वाजता चक्कर मारा असे म्हणाले. त्यानंतर मी व पंच 1 तेथुन निघुन पो.उपअधी.श्री. लोखंडे व सापळा पथक थांबले त्या ठिकाणी परत आलो. पो.उपअधी.श्री. लोखंडे यांचे सुचनेवरून पोकॉ निमसे यांनी माझेकडील व्हाईस रेकॉर्डर ताब्यात घेवुन ते बंद केले. पो.उपअधी.श्री. लोखंडे यांनी मला व पंच नं. 1 यांना घडलेल्या घटनेविषयी हकीकत विचारली. त्यानंतर व्हाईस रेकॉर्डर मधिल ध्वनीमुद्रीत संभाशण सर्वांनी ऐकले. त्यामध्ये तलाठी मोराळे यांनी माझेकडे लाचेची मागणी केली नसल्याचे निष्पन्न झाले. तलाठी यांचे हाताखाली काम करणारे खाजगी इसम सागर नलवडे यांनी माझ्याकडे लाचेची मागणी केली असल्याने त्यांचेविरूध्द दि. 29/02/2024 रोजी लाचेचा सापळा लावण्याचे सर्वानुमते ठरले. त्यानंतर पो.उपअधी. श्री. लोखंडे यांनी मला सुचना देवुन ते सापळा पथकासह अहमदनगरकडे रवाना झाले.

त्यानंतर संध्याकाळी 08.30 वाजेदरम्यान खाजगी इसम श्री. सागर नलवडे हे माझे घरी आले होते. त्यांनी मला तुमचे खरेदीखताच्या नोंदीचे काम होवुन जाईल असे सांगितले. मी त्यांना तुम्ही नोंद लावण्यासाठी 7000/- रूपये मागितले होते ते मी उदया घेवुन येतो असे म्हणालो असता त्यांनी पैसे नाही लागत, नोंदीचे कामकाज करून देतो असे सांगितले. यावरून सागर नलवडे यांना माझे वर्तनुकीसंबंधाने काहीतरी संशय आला असावा त्यामुळेच ते माझे घरी संध्याकाळी येवुन मला 'तुमचे नोंदीचे काम होवुन जाईल' असे म्हणाले असावेत.

त्यानंतर पो.उपअधी.श्री. लोखंडे यांनी दिलेल्या सुचनेप्रमाणे मी दि.29/02/2024 रोजी 11/00 वा. कर्जत येथील सुरक्षित ठिकाणी हजर होतो. थोडया वेळाने पो.उपअधी.श्री. लोखंडे हे सापळा पथक व दोन पंचासह शासकिय वाहनाने मी थांबलेल्या ठिकाणी आले. मी शासकिय वाहनात बसलो. तेथे मी सागर नलवडे यांना लाच म्हणुन देण्यात येणारी 7000/-रुपये रक्कम त्यात 500/-रु. दराच्या 14 चलनी नोटा हजर केल्या. शासकिय वाहनात अँन्थ्रासिन पावडर व अल्ट्राव्हायोलेट दिव्याच्या वापराबाबत पो.उपअधी.श्री. लोखंडे यांनी माहिती देवुन त्याचे प्रात्यक्षिक सापळा पथकातील पोकॉ सुद्रुक यांना करून दाखविण्यास सांगितले. त्याप्रमाणे त्यांनी प्रात्यक्षिक करून दाखवुन मी हजर केलेल्या नोटांना दोन्ही बाजुंनी अँन्थ्रासिन पावडर लावली व सदरच्या नोटा माझे शर्टच्या छातीवरील डाव्या बाजुच्या खिशात ठेवुन दिल्या. त्यानंतर पो.उपअधी.श्री. लोखंडे यांनी सर्वांना सापळा कारवाई दरम्यान करावयाच्या कार्यवाही बाबत सुचना समजावुन सांगितल्या. त्यानंतर मी पो.उपअधी.श्री. लोखंडे यांना कळविले की, दि. 28/02/2024 रोजी मी दोन वेळा पंच नं. 1 यांना सोबत घेवुन सागर नलवडे व तलाठी मोराळे यांची भेट घेतली आहे. नलवडे यांना पंच नं 1 यांचेबाबत काहीतरी संशय आलेला असावा त्यामळे सागर नलवडे हा पंच नं 1 यांचे समक्ष लाच रक्कम स्विकारणार नाही त्यामुळे लाच रक्कम देते वेळी पंच नं 2 यांना माझ्या सोबत पाठवावे असे कळविल्यावरून सर्वानुमते पंच नं 2 यांना माझ्यासोबत पाठविण्याचे ठरले. त्यानंतर पो.उपअधी.श्री. लोखंडे यांचे सुचनेवरून पोकॉ निमसे यांनी व्हाईस रेकॉर्डर चालु करून माझे ताब्यात देवुन मला व पंच नं. 2 यांना खाजगी इसम नलवडे यांची भेट घेण्याकरीता 13/00 वा. माझेकडील मोटार सायकलने तलाठी कार्यालय कर्जत येथे रवाना केले. आमच्या पाठोपाठ पो.उपअधी.श्री. लोखंडे, सापळा पथक असे शासकिय वाहनाने येवुन तलाठी कार्यालयाच्या आजुबाजुस सापळा लावुन थांबले. मी व पंच नं. 2 तलाठी कार्यालयात गेलो. तेथे खाजगी इसम नलवडे व तलाठी मोराळे हे दोघेही हजर नव्हते. मी तेथे हजर असलेल्या इसमास तलाठी मोराळे व सागर कोठे आहे असे विचारले असता त्यांनी मतदान केंद्रावर गेले आहेत असे सांगितले. त्यानतर मी सागर नलवडे यांना फोन करून ते कुठे आहेत याबाबत विचारले असता त्यांनी ते भांडेवाडी शाळेवर असल्याचे सांगितले. त्यानंतर मी व पंच नं. 2 असे जवळच असलेल्या भांडेवाडी या शाळेत गेलो. आमच्या पाठोपाठ पो.उपअधी.लोखंडे व सापळा पथक शासकिय वाहनाने येवुन सदर शाळेच्या आजुबाजुस सापळा लावुन थांबले. सदर शाळेत सागर नलवडे यांची भेट झाली. मी त्यांना काल बोलणे झाल्याप्रमाणे मी पैसे घेवुन आलो आहे असे म्हणुन माझे शर्टच्या वरच्या खिशात ठेवलेली अँन्थ्रासिन पावडर लावलेली लाचेची रक्कम सागर यांचे समोर धरली असता त्यांनी ''पैसे कुणी मागितले तुम्हाला, पैसे नाही लागत, दयायचे असतील तर घर बांधायला लाख दोन लाख रूपये दया मला'' असे म्हणुन लाचेची रक्कम स्विकारण्यास नकार दिला. त्यानंतर मी व पंच नं. 2 असे तेथुन निघुन रवाना केले त्या ठिकाणी परत आलो. आमच्या पाठोपाठ पो.उपअधी.लोखंडे व सापळा पथक आले. तेथे मी पो.उपअधी.श्री.लोखंडे यांना कळविले की, तलाठी मोराळे यांचे हाताखाली काम करणारे खाजगी इसम सागर नलवडे यांनी माझेकडुन लाचेची रक्कम स्विकारण्यास नकार दिला आहे. एकंदरित सागर नलवडे यांना माझे वर्तनुकी संबंधाने काही संशय आला असावा, तसेच भविष्यात देखील सागर नलवडे हे माझ्याकडुन लाच स्विकारणार नाहीत याची मला खात्री झाली आहे असे सांगुन सदरची सापळा कारवाई पुर्णतः स्थगित करून पुढील कायदेशीर कार्यवाही करावी असे सांगितले. त्याप्रमाणे पो.उपअधी.श्री. लोखंडे यांनी माझा तसा जबाब नोंदवुन घेतला.

आज रोजी पो.उप अधी.श्री.लोखंडे यांनी माझेशी संपर्क करून कळविले की, 'तलाठी कर्जत यांचे हाताखाली काम करणारे खाजगी इसम सागर नलवडे यांनी दि.28/02/2024 रोजी माझेकडे आमचे खरेदी खताची नोंद 7/12 उता-यावर लावण्यासाठी तलाठी यांचेकरीता व स्वतःकरीता 7,000/-रु.लाचेची मागणी केली असल्याने त्यांचे विरुध्द गुन्हा दाखल करणेबाबत वरिष्ठ कार्यालयाची परवानगी प्राप्त झाली असल्याचे कळविले व मला खाजगी इसम सागर नलवडे यांचेविरुध्द फिर्याद देणेबाबत कळविले. त्याप्रमाणे मी फिर्याद देत आहे.

तरी मौजे कर्जत येथील गट नं. 134/1 मधिल संपूर्ण विहीर पाणी हिस्सा व दोन आर विहीरपड क्षेत्रात जाणे येणेचे हक्काबाबत मी व माझ्या भावाने केलेल्या खरेदीखताची नोंद 7/12 उता-यावर लावण्यासाठी' तलाठी कर्जत यांच्या हाताखाली काम करणारे खाजगी इसम सागर नलवडे यांनी मी दि.28/02/2024 रोजी नोंदविलेल्या लाच मागणी तक्रारीचे अनुषंगाने करण्यात आलेल्या लाच मागणी पडताळणी कारवाई दरम्यान दुपारी 15/38 ते 15/59 वा. या कालावधीत तलाठी कार्यालय कर्जत येथे पंच नं. 1 यांचे समक्ष माझ्याकडे तलाठी यांचेकरीता व स्वतःकरीता 7,000/-रु. लाचेची मागणी करून ती रक्कम स्विकारण्याची संमती दर्शवली असल्याने माझी तलाठी कर्जत यांचे हाताखाली काम करणारे खाजगी इसम सागर नलवडे पुर्ण नाव व पत्ता माहीत नाही यांचे विरूध्द फिर्याद आहे.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

Maruti Namdeo Muluk(I (Inspector)) / pobnncmam85159 **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.** (गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

पोलीस ठाणे अमलदार
कर्जत पोलीस स्टेशन अ नगर

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): Maruti Namdeo Mulı
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.): pobnpcmam85159

**Attachment to item 7 of First Information Report** (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र)**: Physical features, deformities and other details of the ( If known / seen )**(संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्टये, व्यंग आणि इतर तपशील**))**

| S.No.(अ.क्र.) | Sex (लिंग) | Date/Year of Birth (जन्म तारीक/ वर्ष) | Build (बांधा) | Height (cms.) (उंची(सें. मी.)) | Complexion (रंग) | Identification Mark (s) (ओळखीच्या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |

| Deformities/ Peculiarities | Teeth (दात) | Hair (केस) | Eyes (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit(s) (पोषाखाच्या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |

| Language /Dialect (भाषा / बोलीभाषा) | Place Of (का स्थान) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark (भाजल्याच्या खुणा) | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
**(**जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल**.)**